माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

# माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

डॉ. संतोष रावसाहेब देशमुख
एम. डी. आयुर्वेद, मुंबई

## ताप (ज्वर व्याधी) पथ्य

**चिकित्सा सूत्र :** लंघनं स्वेदनं कालो यवाग्वतिक्तकोरसः ।
पाचनान्यविपक्वानां दोषाणां तरुणे ज्वरे ।। च. चि.
(ताप आलेला असल्यास लंघन म्हणजे उपवास करावे.)

**आहार :**

1. आले/सुंठ घातलेला चहा प्यावा.
2. मुगाचे कढ़ण धणे, जीरे, सुंठ घालून प्यावे किंवा भाताची पेज घ्यावी.
3. फळे: खाण्याची इच्छा झाल्यास डाळिंब, मोसंबी चालेल. दूध पिऊ नये.
4. पाणी उकळून गार केलेले प्यावे. (धणे, सुंठ, तुळस घातलेले पाणी उत्तम).
5. नवीन तापात भूक कमी लागते.
6. दही विशेषतः वर्ज्य करावे.

**विहार :**

- ऊबदार कपडे घालावेत, बाहेर जाऊ नये (जायचे असल्यास दोन्ही कानात कापूस ठेवावा.) शक्यतो आराम करावा.
- क्रोध, शोक यापासून लांब रहावे व रुग्णास तापदायक माणसाचा संपर्क होऊ देऊ नये.
- कपाळावर सुंठ, कापूर यांचा लेप करावा व डावा कान कापसाने बंद करावा व पाठीचा मणका शेकून घ्यावा.
- स्नान करु नये पण सकाळी ज्वरवेग नसताना/१०-११ च्या दरम्यान ओल्या कपड्याने अंग पुसून घ्यावे.
- रीठा, शिकेकाई, कडुनिंब, वेखंड यांचा वापर करावा.

- रुग्णाच्या खोलीत रक्षोघ्न द्रव्यांनी धूपन करावे.

**ताप उतरल्यावर :**

**आहार :** वरील आहाराबरोबर भूक लागल्यास

- गुळवेल पाने, फळभाज्या (सव ) चालतील. (तोंडली, गवार, बटाटा, टोमॅटो, भारताचे वांगे सोडून).
- गाईचे दूध पण ते सुंठ/वेलची सिध्द केलेले. जुन्या तांदळाची खिचडी.
- मांसाहार : चिकण सूप, हळद, धणे, जिरे यांची फोडणी दिलेले व मुख्यतः घरी तयार केलेले.
- अशक्तपणा वाटत असल्यास ग्लुकोज, इलेकट ॉल पावडर पाण्यातून घेणे.
- शुद्ध जल षडंगोदकाचा वापर करावा.

**विहार :**

- स्नान करावे व अशक्तपणा नसल्यास घराबाहेर जावे.
- ब्रम्हचर्य पाळावे. (शरीर संबंध ठेवू नये).

**पंचकर्म :** क्षीर बस्ती

पंचकर्म वैद्यकीय सल्ला व निरीक्षणाखाली करावे.


अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

| क्र. | माधवप्रिया शाखा | संपर्क | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - प्रमुख शाखा | 7045607187 | |
| २ | कांदिवली | 7304751357 | |
| ३ | गिरगाव | 022-22081081 | |
| ४ | पुणे - तिसरा रविवार | 8169507436 | |
| ५ | कोल्हापूर - पहिला रविवार | 7045607187 | |